## परिचय :

जर सूर्य उगवला नाही तर याची कल्पना सुद्धा करवत नाही. कारण संपूर्ण जीवन सृष्टी बदलून जाईल. सूर्य हाच आपल्या जगण्याचा प्रमुख स्त्रोत आहे. आपले नैसर्गिक चक्र हे सूर्याच्या प्रकाश आणि उष्णता वर अवलंबून असते. जे काही सजीव जीव आहेत त्यांना आणि पृथ्वी वरचे वातावरण संतुलित करण्यासाठी सूर्य नेहमी उगवणे गरजेचे आहे. त्याही पलीकडे अजून आपत्ती जनक परिणाम मोठ्या प्रमाणावर होतील.

## वनस्पती आणि प्राण्यां वर होणार परिणाम :

पहिल्यांदा आणि सर्वात मोठा बदल घडेल तो म्हणजे जी रोपं आणि वनस्पती सूर्यप्रकाशात त्यांचे अन्न बनवतात ती प्रक्रिया बंद होईल. ती वनस्पती सूर्यप्रकाशाचे अन्ना मध्ये रूपांतर करतात. जर सूर्यप्रकाशाच नाही तर आपल्या ला लागणारे अन्न हे भेटणारच नाही. पूर्ण आपली जीवन शैली ची साखळी विस्कळीत होईल. तसेच अन्य जीव जंतू सुद्धा वनस्पतींवर अवलंबून असतात. हळू हळू वनस्पती मरून जातील किंवा सर्वांना पुरेल अस अन्न ते बनवू शकणार नाही. पृथ्वी वरील संपूर्ण इकोसिस्टिम कोसळून जाईल आणि सर्वीकडे भूक मारी पसरेल. गाई सुद्धा सूर्यप्रकाशाच्या मदतीने तीच्या बछड्यांसाठी दूध बनवते.

## मानव जाती वर होणार परिणाम :

मानव जाती वर तर त्याचे मोठ्या प्रमाणावर दुष्परिणाम पाहायला भेटतील. हवा आणि झाडे मानव जीवन चक्रासाठी तितकेच महत्वाचे आहेत जितका सूर्य प्रकाश. हवा वाहती नसल्याने ऑक्सिजन ची तर समस्या असेल परंतु आपण जे एकमेकांना फोने करतो त्याचे सिग्नल पण हवेत तुन जातात. हवाच नसेल तर सिग्नल, सॅटेलाईट, रेडिओ सारख्या गोष्टी ठप्प पडतील. आपल्या सौर यंत्रणेत पृथ्वीची जागा अशी उत्तम आहे कि सर्व सजीव जिवंत राहू शकतो. सूर्य नसेल तर हळू हळू पृथ्वी वर बर्फ जमा होईल. सर्वीकडे जास्तीत जास्त थंड वातावरण होईल. इतके थंड कि जगणे अवघड होईल. सूर्याच्या उष्णेते मुळे बाष्पीभवन प्रक्रिया होऊन पाण्याचे ढग होतात. ते पण होणार नाही. मग आपल्याला पिण्यायोग्य पाणी सुद्धा भेटणार नाही. पृथ्वी वर जगणे कठीण होऊन जाईल.

## हवा आणि यांतील बदल :

या शिवाय पृथ्वी वरील संतुलित हवामानावर नकारत्मक परिणाम दिसून येतील. मुख्य म्हणजे सूर्याची उष्णता हि हवा आणि पाणी यांना नेहमी खेळती ठेवते. ज्याने करून पाणी आणि हवा हे सतत वाहत असतात. जर सूर्यच नाही तर अन्न, हवा आणि पाणी यांची साखळी तुटून जाईल आणि सर्व सृष्टी ला भयानक असे परिणाम बघावे लागतील. सूर्य नसेल तर आपली पृथ्वी ही थंड होऊन जाईल. एक उजाड जमीन होऊन जाईल जिथे राहणे कठीण होईल. आपण निसर्गाच्या खूप भयानक परिणामाला साक्ष असू.
याव्यतिरिक्त पृथ्वीचे रात्र आणि दिवस चक्र खराब होईल. झोपायचा कधी उठायचा कधी हे सुद्धा कळणार नाही. काही प्राण्यांचा तर प्रत्येक दिवसाचा उपक्रम हा फक्त सूर्य प्रकाशावर अवलंबून असतो. जसं कि शिकार करणे, चार आणि प्रजनन. त्यांना खूप संघर्ष करावा लागेल जगण्यासाठी. प्राण्यांचे जीवन चक्र सुद्धा खराब होईल. कालांतराने सर्व प्राणी मरण पावतील.

## सारांश :

एकंदरीत निष्कर्ष काढला तर, रोज सूर्य उगवणे हे तितकेच महत्वाचं हे जितके आपले जगणे. पृथ्वीचे नैसर्गिक चक्र हे विस्कळीत होईल. मोठ्या प्रमाणावर जीव हानी होईल. कालांतराने पृथ्वी हे जगता येणार नाही अस ठिकाण बनेल. काही वेळा सूर्य ला आपण कमी महत्वाचा समजतो पण सजीवांना तो जीवन दान देत असतो. म्हणून आपण सुद्धा पृथ्वीची होणारी हानी सुद्धा कमी केली पाहिजे. प्रदूषण, अणुबॉम्ब टेस्टिंग, प्लास्टिक आणि वाढते कारखाने यांपासून सुद्धा पृथ्वीचा नसर्गिक संतुलन खराब होते. सूर्य हा आपल्या जगण्याचा

आणि पृथ्वी वरील जीवन चक्र चालू ठेवण्याचा मुख्य स्त्रोत आहे.